# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 16 May 2024

## Time: 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक: १६ मे २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या आणि राज्यातल्या शेवटच्या टप्प्याचा प्रचार अंतिम टप्प्यात, भाजपचे ज्येष्ठ नेते, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नाशिक जिल्ह्यात तसंच कल्याणमध्ये सभा
- नागरिकत्व सुधारणा कायद्याच्या अंतर्गत पहिल्यांदाच १४ जणांना नागरिकत्व प्रमाणपत्र प्रदान
- मुंबईत कोसळलेल्या फलकाच्या सुट्या भागांसह राडारोडा हटवण्याचं काम युद्ध पातळीवर सुरू

  आणि
- फेडरेशन चषक स्पर्धेत भालाफेकपटू निरज चोप्राला सुवर्ण पदक

****

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या आणि राज्यातल्या शेवटच्या टप्प्याचा प्रचार येत्या शनिवारी संपणार असून, या टप्प्याचा प्रचार आता शिगेला पोहोचला आहे. या टप्प्यात राज्यातल्या धुळे, दिंडोरी, नाशिक, पालघर, भिवंडी, कल्याण, ठाणे आणि मुंबईतल्या सहा मतदारसंघांचा समावेश आहे. या मतदारसंघात येत्या २० तारखेला मतदान होणार आहे.

भाजपचे ज्येष्ठ नेते, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल नाशिक जिल्ह्यातल्या पिंपळगाव बसवंत इथं सभा घेतली. नाशिकचे महायुतीचे उमेदवार हेमंत गोडसे आणि दिंडोरीच्या महायुतीच्या उमेदवार भारती पवार यांच्या प्राचारार्थ झालेल्या या सभेत पंतप्रधानांनी, विरोधी पक्षांवर कडाडून टिका केली.

नाशिक मधल्या कांद्याच्या प्रश्नावर बोलताना मोदी यांनी, केंद्र सरकारने कांद्याचा बफर स्टॉक करण्याची योजना सुरु केल्याचं सांगितलं. कांद्यासह इतर पिकांसाठी सरकार ऑपरेशन ग्रीन राबवत असून, कांद्याच्या वाहतुकीसाठी अनुदान दिलं जाईल, असं ते म्हणाले.

त्यानंतर मोदी यांनी कल्याणमध्ये महायुतीचे उमेदवार श्रीकांत शिंदे यांच्या प्रचार सभेला संबोधित केलं.

मुंबईत घाटकोपर इथ मोदी यांनी काल रोड शो केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुंबई भाजपचे अध्यक्ष आमदार आशिष शेलार, उमेदवार मिहीर कोटेचा, उज्वल निकम यावेळी उपस्थित होते.

****

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी काल दिंडोरी लोकसभा मतदार संघातले महाविकास आघाडीचे भास्कर भगरे यांच्या प्रचारासाठी वणी इथं सभा घेतली. तसंच त्यांनी मुंबईत कांजुर मार्ग इथंही प्रचारात सहभाग घेतला.

तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अध्यक्ष उद्धव ठाकरे यांनी नाशिक लोकसभा मतदार संघातले महाविकास आघाडीचे उमेदवार राजाभाऊ वाजे यांच्या प्रचारार्थ नाशिक इथं सभा घेतली. इलेक्टॉरल बॉण्ड हा सर्वांत मोठा घोटाळा असून, याबाबत खुली चर्चा करण्याचं आव्हान सरकारला देत असल्याचं ठाकरे यावेळी म्हणाले.

****

भारतीय जनता पक्षाचे नेते आणि केंद्रीय मंत्र्यांच्या शिष्टमंडळानं, काँग्रेस आणि इंडिया आघाडी कडून आदर्श आचारसंहितेचा भंग झाल्याची तक्रार निवडणूक आयोगाकडे केली आहे. या शिष्टमंडळात केंद्रीय मंत्री एस.जयशंकर, जी.किशन रेड्डी, अर्जुन राम मेघवाल आणि राजीव चंद्रशेखर यांचा समावेश होता. आदर्श आचारसंहिता भंगाची २२ उदाहरणं आयोगासमोर ठेवली असून, त्यावर त्वरित कारवाईची मागणी केल्याचं जयशंकर यांनी या बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना सांगितलं.

****

'लोकनिर्णय महाराष्ट्राचा' या कार्यक्रमात आजच्या भागात आपण दक्षिण – मध्य मुंबई लोकसभा मतदार संघांचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात या वेळेत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

****

महादेव बेटिंग ॲप प्रकरणी पुण्यातल्या नारायणगावमध्ये पोलीसांनी धाड टाकून ७० जणांना अटक केली. परदेशासह देशातल्या इतर राज्यात धाडी टाकल्यानंतर महादेव ऑनलाइन बेटिंग ॲपच काम नारायणगावामधून सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. या ऑनलाईन सट्टेबाजी ॲपच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांचं हवाला त्यांनी केल्याचं अंमलबजावणी संचालयानलयानं केलेल्या तपासात उघड झालं आहे.

****

सीएए अर्थात नागरिकत्व सुधारणा कायद्याच्या अंतर्गत काल पहिल्यांदा १४ जणांना नागरिकत्व प्रमाणपत्रांचं वाटप झालं. या कायद्याच्या अंतर्गत अर्ज केलेल्या या व्यक्तींना केंद्रीय गृहसचिव अजयकुमार भल्ला यांनी ही प्रमाणपत्र सुपूर्द केली. या अधिसूचनेनुसार ३१ डिसेंबर २०१४ पूर्वी पाकिस्तान, बांगलादेश किंवा अफगाणिस्तानातून भारतात आलेल्या हिंदू, शीख, जैन, बौद्ध, पारसी आणि ख्रिश्चन धर्माच्या व्यक्तींनी नागरिकत्वासाठी अर्ज करायचे होते.

****

मुंबईतल्या घाटकोपर मध्ये छेडा नगर परिसरात कोसळलेल्या फलकाचे सुटे भाग करण्यात आले आहेत. या सुट्या भागांसह राडारोडा हटवण्याचं काम युद्ध पातळीवर सुरू आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेसह मुंबई अग्निशमन दल, मुंबई पोलीस, १०८ रुग्णवाहिका सेवा, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद पथक, भारत पेट्रोलियम, महानगर गॅस आणि इतर सर्व संबंधित शासकीय तसंच बाह्य यंत्रणा आपसात समन्वय राखून अव्याहतपणे कार्यरत आहेत. १३ तारखेला झालेल्या या दुर्घटनेत १४ जणांचा मृत्यू झाला, तर ७४ जखमींना सुखरूपपणे बाहेर काढण्यात यश आलं.

****

दरम्यान, या घटनेच्या पार्श्वभूमीवर लातूर जिल्ह्यातले विनापरवानगी, अनधिकृत फलक तत्काळ काढून, संबंधितांवर कठोर कारवाई करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी, लातूर शहर महानगरपालिका आणि

जिल्ह्यातल्या सर्व नगरपरिषद, नगरपंचायतीचे मुख्याधिकाऱ्यांना दिल्या आहेत. होर्डिंगचं स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात यावं, अवकाळी पाऊस, वादळाच्या काळात जाहिरात फलकामुळे होणारे अपघात टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात याव्यात, आदी सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

****

रत्नागिरी – सिंधुदुर्ग लोकसभा मतदार संघात नुकत्याच झालेल्या निवडणूक प्रक्रियेदरम्यान भाजपचे उमेदवार नारायण राणे यांना मतदान करण्यासाठी पैसे वाटप झालं असल्याची तक्रार, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार वैभव नाईक यांनी, निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे केली आहे. या निवडणुकीत नारायण राणे यांनाच मतदान करण्यासाठी सिंधुदुर्ग जिल्ह्यात प्रत्येक गावात मतदारांना पैसे वाटप झाल्याचं निदर्शनास आलं असल्याचं नाईक यांनी या तक्रारीत म्हटलं आहे.

****

राष्ट्रीय डेंग्यू दिवस आज पाळला जात आहे. त्यानिमित्त आज आरोग्य विभागाच्या वतीनं विविध जनजागृतीपर कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. नागरिकांनी आपल्या घरातील पाणी साठवणुकीचं भांडं आठवड्यातून एकदा रिकामं आणि कोरडं करुन भरावं, एक दिवस कोरडा पाळण्यात यावा, आपल्या घराच्या आजुबाजूचा परिसर स्वच्छ राहील याची काळजी घ्यावी, असं आवाहन, लातूर महानगरपालिकेचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. शंकर भारती यांनी केलं आहे.

****

आगामी काळातल्या संभाव्य पाणीटंचाईवर मात करण्यासाठी परभणी जिल्हा प्रशासनाकडून सर्व उपाययोजना करण्याच्या सूचना, जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी संबंधित यंत्रणेला दिल्या आहेत. पाणी टंचाई आढावा बैठकीत काल ते बोलत होते. आवश्यकता भासल्यास विहीर–कुपनलिकांचं अधिग्रहण करण्यात येईल, असं त्यांनी सांगितलं. जिल्ह्यातल्या लघु, मध्यम आणि मोठ्या प्रकल्पातल्या उपलब्ध पाणीसाठ्याचा जिल्हाधिकारी गावडे यांनी आढावा घेतला.

****

जलजीवन मिशन अंतर्गत लातूर जिल्ह्यात सुरु असलेल्या कामांना गती देण्याची आवश्यकता असून, या कामांमध्ये दिरंगाई करणाऱ्या कंत्राटदारांची गय केली जाणार नाही, असा इशारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी दिला. यासंदर्भातल्या बैठकीत ते काल बोलत होते.

****

आगामी खरीप हंगामात शेतकर्यांनी अनधिकृत एच.टी.बी.टी कापुस बियाणे खरेदी आणि लागवड करु नये, असं आवाहन नांदेडचे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी बी.एस.बऱ्हाटे यांनी केलं आहे. गुणवत्ता आणि दर्जाची हमी देणाऱ्या अधिकृत कंपनी आणि बियाणे विक्री परवानाधारकांकडुनच कापुस बी.टी.बियाणे पावतीसह खरेदी करावे, असं त्यांनी सांगितलं आहे. फसवणूक तसंच बनावट, भेसळयुक्त बियाणे खरेदी टाळण्यासाठी त्यांनी हे आवाहन केलं आहे.

****

नाशिकच्या महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या उन्हाळी सत्राच्या पहिल्या टप्यातल्या वैद्यकीय विद्याशाखेच्या पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या लेखी परिक्षा येत्या १८ मे पासून सुरु होणार आहेत. राज्यातल्या एकूण ३९ परीक्षा केंद्रावर या परीक्षा घेण्यात येणार आहेत. परिक्षेबाबतची अधिक माहिती विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथं उद्यापासून, 'मराठवाडा आर्ट, कल्चर अँड फिल्म फाऊंडेशन' आणि 'महात्मा गांधी मिशन'तर्फे आयोजित जिगीषा नाट्यसहवास या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. यावर्षीपासून जिगीषा तर्फे मिलिंद सफई स्मृती पुरस्कार प्रदान करण्यात येणार असून, यावर्षीचा पुरस्कार लेखक-दिग्दर्शक-अभिनेते धनंजय सरदेशपांडे यांना प्रदान करण्यात येणार आहे.

****

कल्याण पूर्व विधानसभा मतदारसंघात काल स्थिर सर्वेक्षण पथक - एसएसटीनं कल्याण रेल्वे स्थानकातून सात लाख रुपयांची संशयास्पद रोकड जप्त केली. कल्याण रेल्वे स्थानकात जयेश पोटे याच्या जवळील बॅगेची तपासणी केली असता, त्याच्याकडे ही रोकड आढळली. या रोख रक्कमेबाबत त्याला योग्य प्रकारे उत्तरं न देता आल्यानं, ही रोकड पथकाकडून जप्त करण्यात आली.

****

भुवनेश्वर इथं झालेल्या फेडरेशन चषक २०२४ स्पर्धेत भालाफेकपटू निरज चोप्रानं सुवर्ण पदक पटकावलं. पहिल्या तीन फेऱ्यांमध्ये नीरज दुसऱ्या स्थानावर होता, मात्र चौथ्या फेरीत ८२ पूर्णांक २७ मीटर अंतरावर भाला फेकत त्याने अव्वल स्थान पटकावलं.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात वैजापूर तालुक्यात लोणी खुर्द, नायगव्हाण, जरुळ, आणि भादली इथं काल संध्याकाळच्या सुमारास वादळीवाऱ्यासह जोरदार पाऊस झाला. या पावसामुळे अनेक घरांवरील पत्रं उडाली, तसंच काही ठिकाणी झाडं उन्मळुन पडली.

****